**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ६** **नि.फौ.ख.क्र. २१/२०२३**

महाराष्ट्र शासन वि. देविदास व इतर

**नि.क्र. ४८**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – चंद्रकला रामचंद्र बालपांडे,

वय – ६० वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – वार्ड क्र. ७, नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–**

दि. ०७/१२/२०२२ रोजी माझे पती, २ मुले (रविंद्र बालपांडे व सुरेंद्र बालपांडे) व १ स्त्री मजुर अशे एकून ४ लोकं अंदाजे १०:०० वाजताच्या सुमारास सकाळी माझ्या मुलांच्या भायवाडी येथील शेतीमध्ये काम करण्यासाठी गेले होते. माझ्या तिन्ही मुलांची एकुण शेती २.७५ एकर आहे. माझा मोठा मुलगा नामे राजेंद्र बालपांडे घरी येउन मला विचारले की शेतीवर कामासाठी चालते का. मी राजेंद्र बालपांडे सोबत अंदाजे ०२:०० वाजता शेतामध्ये गेली. सकाळी माझे पती व दोन मुलांसोबत शेतीवर जाणा–या मजुराचे नाव लक्ष्मीबाई होते. त्यावेळी आमच्या शेतामध्ये पराटी (कापुस), मोसंबी आणि गहू चे पिक होते.

२. मी ०२:०० वाजता शेतात गेल्यानंतर त्या ठिकाणी आरोपी क्र. १ देविदास, आरोपी क्र. २ मोहन व या दोघांचा आणखीन एक सख्खा भाउ आणि साळा असे चौघे आमच्या शेतामध्ये आले. आरोपी क्र. १ नी शिवीगाळ केली. घटनेच्या एक दिवस अगोदर म्हणजे ०६/१२/२०२२ रोजी आरोपी क्र. १ ते ३ यांनी माझ्या मुलांच्या शेतातील पराटी कापली होती. या कारणाने ०६/१२/२०२२ रोजी पोलीस चौकी, मोवाड येथे मी आरोपींविरुध्द रिपोर्ट दिली. आरोपी क्र. १ म्हणाला की, ''*तुझ्या माय बहिणच्या टण्यात लवडा. तुया पोराईचे मुंडके तोडुन गळ्यात घालून गावात फिरवतो तुले नागोंरी करुन.*'' त्यानंतर आरोपी क्र. १ ते ४ व

माझ्या मुलांमध्ये भांडण झाले. ह्या सर्वांमध्ये हातापाई झाली. घटनास्थळी पोलीस आले होते. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयान नोंदविले होते. मी आरोपी क्र. १ ते ४ यांना बघितल्यावर ओळखू शकते. आरोपी क्र. १ आणि २ आज रोजी न्यायालयात हजर आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–</u>

**३.** हे मला माहीत नाही की, आरोपी क्र. १ ते ३ यांची आई कमला शंकर राकेश हिने माझ्या तिन्ही मुलांविरुध्द शेतीच्या विक्रीबाबत दिवाणी न्यायालय, नरखेड येथे केस दाखल केली आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलांनी कमला शंकर राकेश हिचे भाउ गणपती महादेवराव नासरे यांच्याकडून बेकायदेशीर रित्या शेती विकत घेतली. हे म्हणणे खरे आहे की, गणपती नासरे हा नागपूर ला राहत होता. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्याचे ड्युटी नागपूर ला होती आणि घर नरखेड ला व तो दोन्ही ठिकाणी राहत होता. हे मला माहीत नाही की, कमला शंकर राकेश ज्या घरामध्ये राहत होती त्या घराची गणपती नासरे व कमला शंकर राकेश मध्ये वाटणी झाली होती किंवा नाही. हे मला माहीत नाही की, कमला शंकर राकेश एकाच घरात राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, गणपती महादेव नासरे यांचे घर आम्ही विकत घेतलेले घर तोडले. घर तोडतांना माझे ३ मुलं व मी होते. हे म्हणणे खरे नाही की, ते तोडतांना माझे परिवारातील इतर लोकं व १० ते १५ आणखीन लोकं उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. १८/१२/२०२३ नंतर मी, माझे ३ मुलं नामे राजेंद्र, सुरेंद्र आणि रविंद्र व माझे पती सर्वे क्र. ६७, भायवाडी येथील गणपती नासरे कडून विकत घेतलेल्या शेतीमध्ये शेती करत होतो. हे मला माहीत नाही की, दि. ०७/१२/२०२२ रोजीच्या तथाकथित घटनेच्या पुर्वी कमला शंकर राकेश हिने माझे व माझ्या कुटुंबाविरुध्द पोलीस स्टेशन, नरखेड येथे तक्रार दिली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजेंद्र बालपांडे राजकारणी लोकांशी संबंध असून तो राजकारण करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा राजेंद्र रामचंद्र बालपांडे हा २०२५ च्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी या पक्षाकडून नगरसेवक म्हणून निवडून आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता वाचता येत नाही.

४. *''तुझ्या माय बहिणच्या टण्यात लवडा. तुया पोराईचे मुंडके तोडुन गळ्यात घालून गावात फिरवतो तुले नागोंरी करुन.''* हे मी पोलीसांना बयान देतांना सांगितले होते. ते पोलीसांनी माझ्या बयानात का लिहिले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे मला माहीत नाही की, दि. ०७/१२/२०२२ रोजीच्या घटने पुर्वी पासून शेती व घराच्या कारणामुळे आमचे व आरोपीच्या परिवारामध्ये वाद होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामधील आरोपी विरुध्द सांगितलेले सर्व मजकुर खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला माझे बयान वाचून दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलांच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण.</u>

<u>फेरतपास नाही.</u>

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

(**रोहन विजयकुमार थाईल**)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १०/०२/२०२६.**

**दिनांकः १०/०२/२०२६**

**माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 03 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

**साक्षीदाराची सही**
**(चंद्रकला रामचंद्र बालपांडे)**

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता**
**(श्री. व्ही. यु. मिरचे)**